राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे यांचे समोरील माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये दाखल झालेला द्वितीय अपील अर्ज

द्वितीय अपिल क्र.रामाआ-५३४६/२०२१/पुणे

राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे,
नवीन प्रशासकीय इमारत,
विधान भवना समोर, पुणे - १

| अपिलार्थी | उत्तरवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी तथा | प्रथम अपिलीय अधिकारी तथा |
| संदीप सोमनाथ सातव | प्राचार्य, भारतीय संस्कृती दर्शन ट्रस्ट संचलित आयुर्वेदिक महाविद्यालय वाघोली ता. हवेली, पुणे | भारतीय संस्कृती दर्शन ट्रस्ट संचलित आयुर्वेदिक महाविद्यालय वाघोली ता. हवेली, पुणे |

## द्वितीय अपील सुनावणी दिनांक- ०४ - ०९ - २०२४

अपिलार्थी यांनी दि.०७/१२/२०२१ रोजी राज्य माहिती आयुक्त,खंडपीठ पुणे यांचे कडे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले. अर्जदाराने व्दितीय अपिल दाखल करताना माहिती देण्यास नकार असे प्रयोजन नमूद केले.

आयोजित सुनावणीस विद्यमान व तत्कालीन जन माहिती अधिकारी डॉ. आनंद कुलकर्णी हजर आहेत. अपिलार्थी गैरहजर आहेत.

१. अपिलार्थीचा माहिती अर्ज दिनांक ३०/०९/२०२१ रोजीचा असून तो महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापिठ नाशिक यांच्याकडे केलेला आहे. संबधित जन माहिती अधिकारी यांनी सदरचा माहिती अर्ज कलम ६(३) अन्वये जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य, भारतीय संस्कृती दर्शन ट्रस्ट संचलित आयुर्वेदिक महाविद्यालय वाघोली ता. हवेली, पुणे यांच्याकडे वर्ग केला आहे. त्यानंतर संबधित जन माहिती अधिकारी, भारतीय संस्कृती दर्शन ट्रस्ट संचलित आयुर्वेदिक महाविद्यालय वाघोली यांनी दि.३०/९/२०२१ च्या पत्रान्वये अपिलार्थीस उत्तर दिले की, मागणी केलेली माहिती देण्यास आम्हास बंधनकारक नाही.
२. अपिलार्थीचे प्रथम अपिल दि.०२/१०/२०२१ रोजीचे असुन त्यावर तत्कालिन प्रथम अपिलीय अधिकारी तथा प्रथम अपिलीय अधिकार, भारतीय संस्कृती दर्शन ट्रस्ट संचलित आयुर्वेदिक महाविद्यालय वाघोली ता. हवेली, पुणे यांनी अपिल अर्जावर केलेल्या कार्यवाहीचे अभिलेख आयोगास सादर केले नाहीत.
३. सुनावणीच्यावेळी संस्थे तर्फे श्रीमती दिव्याश्री धुमल हजर होत्या, त्यांनी संस्थेतर्फे लेखी निवेदन आयोगाकडे सादर केले. त्यामध्ये संस्थेचे नोंदणीप्रमाणपत्र तसेच महाराष्ट्र शासनाने दिलेले परवानगी

आदेश, आणि मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाच्या प्रती सादर केल्या. त्यांनी पुढे स्पष्ट केले की, अर्जदाराने ज्या आयुर्वेदिक महाविद्यालयाची माहिती विचारली आहे, त्या संस्थेला शासनाकडून कोणतेही अनुदाना प्राप्त होत नाही, त्यामुळे माहिती अधिकार कायदा लागू होत नाही. तसेच मा. उच्च न्यायालयाने खंडपीठ नागपूर यांनी रिट पिटीशन ५२९४/२००८ मध्ये दि.२८/४/२००९ रोजी जे आदेश पारीत केले होते, त्यामध्ये स्पष्ट केले आहे की, पब्लिक ट्रस्ट म्हणून चॅरिटेबल परपज साठी जी संस्था नोंदणी केली जाते, ती सार्वजनिक प्राधिकरण या व्याखेत येत नाही, त्यामुळे माहिती अधिकार कायदा लागू होत नाही.

४. आयोगाकडील उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, अपिलार्थीस माहितीचे प्रदान झालेले नाही.

५. या संदर्भात माहिती अधिकार अधिनियम-२००५ चे कलम २ (एच) मध्ये शासनाचे नोटीफिकेशन (Ordered by appropriate Government) "Any public authority constituted by notification issued or order made by the appropriate government is the public authority" या संदर्भात मा. उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद रिट-पिटीशन क्र.९३०/२०१७ व ८३१८/२०१८ मध्ये दि.१४.०२. २०२२ रोजी पारीत आदेश विचारात घेता, जरी शासनाकडुन अनुदान प्राप्त होत नसेल, तरी शासनाच्या परवानगी आधारावर काम केले जाते. त्यामुळे अशा संस्थांना Public Authority म्हणुन गृहीत धरता येईल. त्यानुसार सर्व शैक्षणिक माहविद्यालय यांना माहिती कायदा लागु होत आहे असा आदेश दिला आहे. तसेच सदर आदेशात मा. उच्च न्यायालय खंडपीठ नागपूर रिट पिटीशन क्र.५१३२/ २००८ मध्ये दिलेल्या आदेशाची सुध्दा दखल घेतलेली आहे. यावरुन संबंधित संस्थेला माहिती कायदा लागु होत आहे. सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे. सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

१. विद्यमान जन माहिती अधिकारी प्राचार्य,भारतीय संस्कृती दर्शन ट्रस्ट संचलित आयुर्वेदिक महाविद्यालय वाघोली ता. हवेली, पुणे यांना आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने जोडपत्र "अ" मध्ये मागणी केलेली माहिती आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसांचे आत अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाव्दारे/ व्यक्तीशः पुरवावी. तसेच जी माहिती उपलब्ध होत नाही किंवा देता येत नाही, त्याबाबतचे स्पष्ट कारण नमुद करुन अपिलार्थीस लेखी कळवावे.

२. प्राचार्य, भारतीय संस्कृती दर्शन ट्रस्ट संचलित आयुर्वेदिक महाविद्यालय वाघोली ता. हवेली, पुणे यांनी आयोग आदेशाची अंमलबजावणी विहीत कालावधीत सुनिश्चीत करावी.

या निर्देशांसह प्रस्तुत द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग महाराष्ट्र सत्यमेव जयते पुणे खंडपीठ

(समीर सहाय)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ पुणे.

जावक क्र. 5333/2024 दिनांक - 7/10/2024.